**ठळक बातम्या**

- देशभरात आज धूलिवंदन आणि होळीचा उत्साह/ राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, प्रधानमंत्री आणि मान्यवरांकडून जनतेला शुभेच्छा

- केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आजपासून ३ दिवस ईशान्येकडच्या राज्यांच्या दौऱ्यावर

- ग्रीनलँड ताब्यात घेता येईल, असा अमेरिकेच्या अध्यक्षांना विश्वास

- इंडियन प्रीमीयर लीग क्रिकेटमधे दिल्ली कॅपिटल्सचं कर्णधारपद खेळाडू अक्षर पटेल याच्याकडे

**आणि**

- लडाख आणि कारगिल मध्ये आज सकाळी भूकंपाचे धक्के

**<><><><><><>**

देशभरात आज धूलिवंदन आणि होळी उत्साहाने साजरी होत आहे. होळीचा सण हा ऋतुराज वसंताच्या आगमनाचं प्रतीक मानला जातो. होळीच्या दिवशी चांगल्याचा वाईटवरचा विजय म्हणून होलिका दहन केलं जातं आणि त्यानंतर रंगांची उधळण केली जाते. देशभरात विविध ठिकाणी हा सण विविध पद्धतीने साजरा होतो. **महाराष्ट्रात** काल जागोजाग होळ्या पेटवून पारंपरिक पद्धतीने होळी साजरी झाली. **मुंबई, ठाण्यात** आज धुळवड खेळली जात आहे. **गुजरातमध्ये** द्वारकेत द्वारकाधीश मंदिरासह अन्य श्रीकृष्ण मंदिरांमध्ये फागुनी पूनम आणि फुलडोल उत्सव साजरा होत आहे. गुलालमिश्रित पाणी, अबीर आणि फुलांची उधळण केली जात आहे. **पश्चिम बंगालमध्ये** हावडा, कोलकातासह अन्य भागांमध्ये

होळीनिमित्त गौर परिक्रमा, भागवत सभा असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

**उत्तर प्रदेशातही** होळीनिमित्त उत्साह दिसून येत आहे. लठमार होळी, फूलों की होळी, लड्डूमार होळी यांसह विविध प्रकारची होळी मथुरा-वृंदावन भागात सुरू आहे. ही होळी पाहण्यासाठी जगभरातून भाविक जमले आहेत. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आज गोरखपूरमध्ये भगवान नृसिंह विश्व यात्रेला हिरवा झेंडा दाखवला आणि उपस्थितांसोबत गुलाल उधळून होळी खेळली. अयोध्येत रामलल्ला आणि वाराणसीत काशी विश्वनाथाला आज होळीनिमित्त गुलाल अर्पण करण्यात आला. सण शांततेत पार पाडण्यासाठी राज्यभरात कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. **दिल्लीतही** होळीचा उत्साह दिसून येत आहे. रमजानमधल्या दुसऱ्या शुक्रवारची प्रार्थना आजच असल्यामुळे पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त ठेवला आहे. दिल्लीची मेट्रो सेवा दुपारी अडीच वाजेपर्यंत बंद ठेवण्यात आली आहे. **राजस्थानात** मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांनी काल रात्री आपल्या निवासस्थानी होलिका पूजन आणि दहन केलं.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्व देशवासियांना होळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. होळीचा सण भारताच्या अमूल्य सांस्कृतिक वारशाचं प्रतीक असून तो एकता, प्रेम आणि सौहार्दाचा संदेश देतो, असं राष्ट्रपतींनी समाज माध्यमावरच्या आपल्या संदेशात म्हटलं आहे. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनीही समाजमाध्यमावरच्या संदेशातून सर्वांना होळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. होळी हा सण म्हणजे चांगल्याचा वाईटावर विजय आणि वसंत ऋतुच्या आगमनाचं प्रतीक आहे, असं धनखड आपल्या संदेशात म्हणाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही देशवासियांना होळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. आनंदाने भरलेला हा सण प्रत्येकाच्या आयुष्यात नवीन उत्साह आणि उर्जा आणेल, असं त्यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या

संदेशात म्हटलं आहे. होळी आणि धुळवडीनिमित्त आज देशातले शेअर बाजार बंद ठेवण्यात आले आहेत.

<><><><><><>

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज रात्री ईशान्य भारताच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर रवाना होत आहेत. शनिवारी सकाळी, आसामच्या गोलाघाट जिल्ह्यात देरगाव इथं नूतनीकृत पोलिस अकादमीचं उद्घाटन शहा यांच्या हस्ते होईल, यावेळी दुसऱ्या टप्प्याच्या ४२५ कोटी ४८ लाख रुपयांच्या प्रकल्पाचा पायाभरणी समारंभही होणार आहे.

यानंतर, शहा मिझोरामला रवाना होतील, तिथं ते आसाम रायफल्सच्या स्थलांतराच्या कार्यक्रमाला उपस्थित राहाणार आहेत. आसाम रायफल्सचं स्थलांतर राज्याच्या आइझॉल या राजधानीपासून सुमारे १५ किमी अंतरावर झोखॉसांग इथं होत आहे.

रविवारी सकाळी, ते आसामच्या कोकराझार जिल्ह्यातील डोटमा इथं जाऊन ऑल बोडो स्टुडंट्स युनियनच्या (ABSU) ५७व्या वार्षिक अधिवेशनाला संबोधित करणार आहेत. दुपारी गुवाहाटीला परत येऊन ते ईशान्य भारतातील आठ राज्यांच्या मुख्यमंत्र्यांसोबत भारतीय न्याय संहितेच्या (BNS) अंमलबजावणीच्या प्रगतीचा आढावा घेतील. या बैठकीत प्रत्येक राज्याकडून भारतीय न्याय संहितेच्या अंमलबजावणीबाबत सादरीकरण दिलं जाणार आहे. रविवारी रात्री शहा नवी दिल्लीला रवाना होतील, असं अधिकाऱ्यांनी सांगितलं.

<><><><><><>

यूएफबीयू अर्थात यूनायटेड फोरम ऑफ बँक यूनियन्सनं येत्या २४ आणि २५ मार्च रोजी होणाऱ्या नियोजित संपाचा इशारा कायम ठेवला आहे. बँकांमधल्या रिक्त पदांवर भरती, पाच दिवसांचा आठवडा यांसह अन्य प्रमुख मागण्यांसाठी इंडियन बँक्स असोसिएशन बरोबर यूएफबीयूची काल चर्चा झाली. मात्र, या चर्चेतून

काही सकारात्मक निष्पन्न झालं नाही त्यामुळे संप करण्यावर ठाम  असल्याचं यूएफबीयूनं जाहीर केलं आहे.

<><><><><>

वेव्हज २०२५ या उपक्रमासाठी देशभरातल्या आशय निर्मात्यांनी आपले अर्ज दाखल केले आहेत. या उपक्रमातल्या ॲनिमेशन फिल्ममेकर्स स्पर्धेसाठी ७८ स्पर्धकांना दुसऱ्या फेरीत प्रवेश मिळाला आहे. अभिजात कथानक, मनोरंजनाचं मूल्य, तांत्रिक बाजू अशा विविध निकषांच्या आधारावर या स्पर्धकांची निवड करण्यात आली आहे. या स्पर्धकांमध्ये विद्यार्थी, हौशी निर्माते, व्यावसायिक निर्माते तसंच निर्मिती स्टुडिओंचा समावेश आहे.

<><><><><>

डेन्मार्कचा स्वायत्त भाग असलेल्या ग्रीनलँडला अमेरिका अधिग्रहित करू शकेल असा आपला विश्वास असल्याचं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. नाटो चे महासचिव मार्क रुट यांच्याशी काल व्हाईट हाऊस मध्ये झालेल्या बैठकीत ते बोलत होते. अमेरिका ग्रीनलँड या बेटाला अधिग्रहित करु शकेल आणि या कामी नाटोचे प्रमुख महत्वाची भूमिका बजावू शकतील, असं ट्रम्प म्हणाले.

ग्रीनलँडमध्ये आधीपासूनच अमेरिकी सैन्य असून यापुढे तिथं अधिक अमेरिकी सैनिक असतील, अशी शक्यता त्यांनी व्यक्त केली. मात्र ग्रीनलँड वर कब्जा करण्याच्या ट्रम्प यांच्या मनसुब्याचा विषय आपल्या अधिकारक्षेत्राबाहेरचा असून नाटो ला या प्रकारात खेचण्याची आपली इच्छा नसल्याचं रुट यांनी स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

सीरियाच्या किनारी भागात मोठ्या प्रमाणावर सुरु असलेल्या हिंसाचाराचा निषेध करणाऱ्या निवेदनाला  तसंच सीरिया मधल्या सर्व नागरिकांच्या रक्षणासाठी

तिथल्या अंतर्गत प्रशासनाशी चर्चा करण्याच्या प्रस्तावाला  संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेनं अनुमोदन दिलं आहे. सीरियातल्या सरकारने धर्म, किंवा वंशाच्या आधारावर भेदभाव न करता सर्व सीरियन नागरिकांचं रक्षण करावं, असं सुरक्षा परिषदेनं म्हटलं आहे.  या संदर्भात रशिया आणि अमेरिकेच्या अध्यक्षांचं निवेदन आज सुरक्षा परिषदेच्या बैठकीत स्वीकारलं जाईल. सीरियाचे माजी राष्ट्राध्यक्ष बशर अल-असद यांचे समर्थक आणि सीरियाच्या हंगामी सरकारमध्ये  सुरु असलेल्या संघर्षात ६ मार्चपासून आतापर्यंत सुमारे एक हजार ३८३ नागरिक ठार झाले आहेत.

<><><><><><>

इंग्लंडमध्ये बर्मिंगहॅम इथं सुरू असलेल्या ऑल इंग्लंड खुल्या विजेतेपद बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या जोडीनं महिला दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. त्यांनी दक्षिण कोरियाच्या काँग ही-योंग आणि किम हाय-जेओंग यांचा पराभव केला. आज त्यांचा सामना चीनच्या टॅन निंग आणि लिऊ शेंगशु या जोडीशी होईल. लक्ष्य सेन यानंही पुरुष एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. त्यानं गतविजेत्या इंडोनेशियाच्या जोनाथन क्रिस्टीचा पराभव केला. उपांत्यपूर्व फेरीत आता सेनची लढत चीनच्या ली शिफेंग याच्याशी होत आहे.

<><><><><><>

इंडियन प्रीमीयर लीग क्रिकेटमधे दिल्ली कॅपिटल्सचं कर्णधारपद अष्टपैलू खेळाडू अक्षर पटेल याच्याकडे सोपवण्यात आलं आहे. अक्षर पटेल २०१९ पासूल आयपीएलच्या ६ हंगामात दिल्ली कॅपिटल्सकडून खेळला आहे. रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूचं नेतृत्व रजत पाटीदारकडे,तर कोलकाता नाईट रायडर्सचं अजिंक्य रहाणेकडे आहे. नव्याने आलेल्या लखनौ सुपर जायंट्सचा कर्णधार ऋषभ पंत असून पंजाब किंग्सचा कर्णधार श्रेयस अय्यर आहे.

<><><><><><>

लडाख आणि कारगिल मध्ये आज सकाळी भूकंपाचे धक्के जाणवले. या भूकंपाची तीव्रता 5 पूर्णांक 2 दशांश रिक्टर स्केल इतकी होती. मात्र या घटनेत कोणतीही जीवितहानी झाल्याचं वृत्त नाही. हिमाचल प्रदेश मध्ये चंबा जिल्ह्यातही अशाच प्रकारचे धक्के जाणवले.

<><><><><><>

पश्चिमी वाऱ्यांच्या प्रभावामुळे देशाच्या काही भागात पावसाने हजेरी लावली आहे. राजस्थानात अनेक ठिकाणी काल संध्याकाळपासून जोरदार पाऊस होत आहे. राज्याच्या बहुतांश भागात पाऊस, गारपीट आणि वादळी वाऱ्यांची शक्यता हवामानविभागाने वर्तवली आहे. हिमाचल प्रदेशात हिमवृष्टी आणि पावसामुळे तापमापकातला पारा शून्याखाली घसरला आहे. लाहौल-स्पीति आणि कुल्लू मधले सुमारे 130 रस्त्यांवरची वाहतूक ठप्प झाली आहे. अनेक ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाला आहे. जम्मू काश्मीर, लडाख आणि अरुणाचल प्रदेशात तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. पश्चिम भारतात आज उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. सौराष्ट्र, कच्छ, विदर्भ, छत्तीसगड या भागात तापमानात वाढ होईल.

//<><><><><><>//